पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, वडगांव गुप्ता, ता.नगर (विळदघाट), जि.अहमदनगर संचलित डॉ.विठ्ठलराव विखे पाटील प्राथमिक विद्यालय, मुकूंदनगर, ता.जि.अहदमनगर या शाळेचे श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ, चिखली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या संस्थेस हस्तांतर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाह ३०१९/प्र.क्र.३०८/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० जून, २०१९

<u>वाचा :</u> शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

<u>संदर्भ :</u> विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र./प्राथ-४/टे-२०१/शाळा हस्तांतरण/२०१८-१९/४३५८, दिनांक १२ जून, २०१८ चे पत्र.

<u>**प्रस्तावना :**</u>

पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, वडगांव गुप्ता, ता.नगर (विळदघाट), जि.अहमदनगर संचलित डॉ.विठ्ठलराव विखे पाटील प्राथमिक विद्यालय, मुकूंदनगर, ता.जि.अहदमनगर या मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित प्राथमिक शाळेचे, श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ, चिखली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या संस्थेस हस्तांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>**शासन निर्णय :**</u>

सदर प्राथमिक शाळेचे, श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ, चिखली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचेकडे हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-
व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथील केली जाणार नाही.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व शासनाकडून याबाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार शाळेस पक्की इमारत, सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

२) शाळेतील अर्हताप्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल करता येणार नाहीत.

३) पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, वडगांव गुप्ता, ता.नगर (विळदघाट), जि.अहमदनगर या संस्थेच्या परिशिष्ट-१ मधील अध्यक्ष व सर्व सदस्यांमध्ये सन २०१७ नंतर बदल झालेला नाही याची त्याचप्रमाणे शाळेतील वैयक्तीक मान्यता प्राप्त कायम शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हस्तांतरणास संमती असल्याची खात्री करण्यात यावी.

४) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर हस्तांतरणानंतरही कार्यरत राहील.

५) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/ मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

६) शासनाकडून शाळा, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/ वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.

७) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार अंमलात येईल.

८) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदल संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेव्दारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी वरील अटी व शर्तीनुसार सर्व बाबी तपासून आणि आवश्यक अन्य अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत ६ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२०१६४३१२३९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.06.20 16:43:35 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,अहमदनगर
४) अध्यक्ष/ सचिव, पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, वडगांव गुप्ता, ता.नगर (विळदघाट), जि.अहमदनगर.
५) अध्यक्ष/ सचिव, श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ, चिखली, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.
६) निवडनस्ती (एसएम-१).